भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०७/२०१७

**१) घराचे किचनची कडी व कोंडा तोडुन आत प्रवेश करुन लोखंडी गोदरेज आलमारीतील सोन्याचे दागीण्याची चोरी .:—**

दिनांक ०३/०७/२०१७ ते ०४/०७/२१०७ चे रात्र. दर. यातील फिर्यादी लखन वसंतराव पांडे वय २८ वर्ष, रा. कोंढी हा आपले परिवारासह जेवन करुन घरी झोपले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन राहते घराचे किचनची कडी व कोंडा तोंडुन आत प्रवेश करुन देवघरामध्ये ठेवलेल्या लोखंडी गोदरेज आलमारीतील सोन्याचे कानातील रिंग ३ ग्रॅम, १ सोन्याची नथ ३ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी ०३ ग्रॅम, सोन्याचा १ डोरला ३ ग्रॅम, व नगदी २५,०००/—रु. असा एकुण ५५,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) पोकलॅन्ड मशिन बावनथडी नदीवरुन चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . .:—**

दिनांक ०१/०७/२०१७ चे २२.०० ते ०२/०७/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील तहसिलदार तुमसर यांनी देवनारा रेती घाटावरुन अवैद्यरित्या रेती उत्खनन करतांना मिळुन आलेल्या २ पोकलॅन्ड मशिन १) मॉडेल आर २१५ एलसी ७ सिरीयल नं. एन ६०३ सी ११६२४ रंग पिवळा २) टाटा हिटाची नंबर ई एक्स २१० एलसीएच व्ही रंग केसरी किमती ३०,०००००/—रु. च्या हया पंचनामा जप्ती पंचनामा कारवाही करुन फिर्यादी कडे सृपृत नाम्यावर दिलेल्या २ पोकलॅन्ड मशिन बावनथडी नदीवर ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी सुधकर बलीराम कोरडे वय ५० वर्ष, रा. देवनारा रा. पोलीस पाटील यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९,१८८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ०३/०७/२०१७ चे १५.३० वा. दर. यातील फिर्यादी अजय अनिलकुमार हसरानी वय १९ वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी हा आपले किराणा दुकानातुन आपले घरी जेवन करण्याकरीता येवुन त्याची हिरो पॅशन एक्स प्रो. मोटार साकल क्रमांक एमएच ३६ एस ३८९२ काळया रंगाची किंमती ३६,०००/—रु. ची घरासमोरील रोडवर ठेवुन घरी जेवन करुन परत किराणा दुकानात जाण्याकरीता बाहेर आला असता घराबाहेर ठेवलेली मोटार सायकल ही दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९, भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुंभलवार पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) सोन्याचे दागीण्याची चोरी . :—**

दिनांक ३०/०६/२०१७ चे १९.३० ते दिंनाक २/०७/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील फिर्यादी सुरेश ओमकार आगाशे वय ३५ वर्ष, रा. रोहा यांनी घरी ठेवलेल्या सोन्याचे दागीणे असलेला पॉकीट फिर्यादीचा मुलगा प्रतीक आगाशे वय ०४ वर्ष, याने खेळायला नेले असता त्यांचे कडुन पॉकीटमधील ४ सोन्याच्या अंगठया सोन्याचे पदक व मणी असलेले मंगळसुत्र ०५ ग्रॅम, सोन्याचे कानातील बिऱ्या ०३ ग्रॅम असा एकुण ३६,०००/—रु. चा माल यातील संशयीत आरोपीतांनी चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन कुंपनाच्या भांडणावरुन व शिवीगाळ करुन दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद –.**

दिनांक ०४/०७/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. तनुजा तेजराम खेब्रागडे वय ५४ वर्ष, रा. पिंडकेपार ही आपले राहते घराचे शेजारील मोकळया जागेत काटयाचे कुंपन करीत असतांनी यातील आरोपी हे तेथे येवुन 'माइया जागेत कुंपन करुन नकोस' असे बोलुन संगनमत करुन फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करुन आरोपी क्र. २ ने दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) बस चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन इसमास धडक देवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/०७/२०१७ चे २०.०० ते २०.३० वा. दर. यातील फिर्यादी सुरेन्द्र बालचंद्र मोथरकर वय ३२ वर्ष, रा. खरबी हे जखमी कृष्णा धुर्वे यांचे सोबत ऊभे असतांनी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बस ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे बसस्थानक वरुन हायवे कडे चालवित आणीत असता फिर्यादी व जखमीला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**७) संगनमत करुन तरुणीला फुस लावुन पळवुन नेवुन तिचे लग्न लावुन दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०६/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादीची तरुण मुलगी हिला आरोपीतांनी संगनमत करुन फुस लावुन पळवुन नेवुन तिचे लग्न लावुन दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३६६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोंडासे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**८) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ०४/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, कारधा, गोबरवाही, साकोली,लाखनी पवनी व लाखांदुर येथे अवैध दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५५ लिटर हातभट्टी दारु किंमती ३७५०/–रु. व ६ लिटर ९३० मिली लिटर देशी दारू कि. १९४५/रु. तसेच जुगारातुन कि. ५२०/–रु. असा एकुन कि.६,२१५/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.